**अतितात्काळ**

क्र. प्रशि/पोभ/२००८ /4077 मुंबई, दि. २५/७/२००८

विषय : पोलीस शिपाई भरती २००८

०००

**प्रेस नोट**

"दिनांक २९/७/२००८ पासून काही पोलीस घटकामध्ये पोलीस भरती जाहीर करण्यात आली होती. सदरची पोलीस भरतीची तारीख पुढे ढकलण्यात आली आहे.

शासनातर्फे नव्याने पोलीसांची जादा पदे मंजूर होत असल्याने या नवीन पदांची व घटकांमध्ये सध्या असलेल्या रिक्त पदांची एकत्रीत भरती घेण्याचे निश्चित झाल्याने दि. २९/७/२००८ रोजी सुरू होणारी पोलीस भरती पुढे ढकलण्यात येत आहे. नवीन भरतीचा सुधारित दिनांक व पदांचा तपशील प्रसार माध्यमाद्वारे लवकरच जाहीर करण्यात येईल.

जुन्या जाहिरातीप्रमाणे ज्या घटक कार्यालयांनी आवेदन अर्जाची विक्री केली आहे, तेच आवेदन अर्ज नव्याने होणाऱ्या पोलीस भरतीकरिता ग्राहय धरण्यात येतील.

ज्या उमेदवारांनी संबंधित घटक कार्यालयाकडून आवेदन अर्ज विकत घेतले आहेत, त्या उमेदवारांनी दिनांक २९/७/२००८ रोजी आवेदन अर्ज दाखल करण्यास कोठेही पोलीस घटकांत जावून नये, भरतीची पूढील तारखी जाहिर झाले नंतर त्या तारखेला त्यांचे जूने आवेदन अर्ज स्विकारण्यात येतील."

**ज्या ज्या पोलीस घटकांनी दि. २९/७/२००८ च्या पोलीस भरतीची जाहिरात दिली आहे, त्यांनी वरील प्रमाणे स्थानिक वर्तमान पत्रात प्रेस नोट द्यावी आणि Paid जाहिरात सुध्दा देण्यात यावी.**

**तसेच पोलीस घटकातील मुख्यालय, सर्व पोलीस स्टेशन ईत्यादी ठिकाणी सदर सुचना पत्रक लावावे. उमेदवारापर्यंत सर्व माहिती वेळेत पोहचेल व त्यांची गैर सोय होणार नाही याची दक्षता घ्यावी.**

Maadhava 25/7/08

**(डॉ माधव सानप)**
**पोलीस उपमहानिरीक्षक,**
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके,
महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त, मुंबई / लोहमार्ग मुंबई सह
सर्व पोलीस अधीक्षक, लोहमार्ग सह
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र १ ते १४

प्रत माहितीकरिता :

अपर पोलीस महासंचालक, कायदा व सुव्यवस्था, म.रा., मुंबई (सादर अग्रेषित)
अपर पोलीस महासंचालक, आस्थापना, म.रा., मुंबई (सादर अग्रेषित)
अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, मुंबई (सादर अग्रेषित)
अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, मुंबई (सादर अग्रेषित)
पोलीस महानिरीक्षक, सर्व परिक्षेत्रीय